**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६००४ महाराष्ट्र
वेबसाईट : www.unishivaji.ac.in
E-mail : appointment.a@unishivaji.ac.in & appointment.b@unishivaji.ac.in
दूरध्वनी :– 2609102, 2609103
Estd.1962
NAAC 'A' Grade

संदर्भ क्र. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/351 दि. 20 OCT 2020

# परिपत्रक

**विषयः– उन्हाळी 2020 मधील अंतिम वर्ष / अंतिम सत्रातील परीक्षांच्या तारखेबाबत.**

सदंर्भः 1. शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/334, दि. 08.10.2020 चे परिपत्रक
2. शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/338, दि. 10.10.2020 चे परिपत्रक
3. शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/341, दि. 15.10.2020 चे परिपत्रक
4. शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांचे कं. विधी–3320/प्र.कं. 84/सीईटीसेल/6833, दि. 16/10/2020 चे पत्र.

उन्हाळी 2020 मधील अंतिम वर्ष / अंतिम सत्रातील परीक्षा दि. 21 ऑक्टोंबर, 2020 पासून सुरू करण्याबाबत सर्व संबंधीतांना कळविणेत आलेले आहे. उपरोक्त संदर्भ क. 4 च्या पत्रानुसार शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांनी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा असलेल्या दिवशी विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या/अंतिम सत्राच्या कोणत्याही परीक्षा ठेवण्यात येवून नये असे कळविले आहे. तसेच राज्यात जास्त प्रमाणात पावसाची शक्यता वर्तवण्यात आल्याने ब–याच भागामध्ये विजेचा पुरवठा खंडीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच इंटरनेट कनेक्टिव्हीटी चा अडथळा आल्यास ऑनलाईन परीक्षा देणा–या विद्यार्थ्यांच्या परीक्षेत अडथळा होण्याची जास्त शक्यता आहे. त्यामुळे कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये यासाठी **दि. 21 ऑक्टोंबर, 2020 पासून सुरू होणा–या अंतिम वर्ष/अंतिम सत्राच्या सर्व अभ्यासकमाच्या परीक्षा दि. 26 ऑक्टोंबर, 2020 पर्यंत स्थगित करण्यात येत आहेत. सदर सर्व अभ्यासकमाच्या परीक्षा दि. 27 ऑक्टोंबर, 2020 पासून सुरू करण्यात येत आहेत.** तसेच सर्व परीक्षेचे नविन वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर जाहीर करणेत येईल. याची नोंद घ्यावी.

सदरचे परिपत्रक महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त संस्थेतील/अधिविभागातील सर्व शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी व इतर सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणावे.

(श्री. गजानन पळसे)
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत– माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी
1. मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था/अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2. मा. कुलगुरू कार्यालय
3. मा. कुलसचिव कार्यालय
4. संकेतस्थळ विभाग – संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी
5. जनसंपर्क विभाग – योग्य त्या प्रसिध्दीसाठी